प्रेस नोट ३१ दिनांक ३०/०८/२०२३

# आर सी एफ पोलीसांनी खुनाचा गुन्हा उघडकीस आणून आरोपीतांस अटक केलेबाबत

फिर्यादी यांचा मुलगा त्यांचा जावई शफी उर्फ शफीक अब्दुल मजिद शेख मु/३३ वर्षे याचेसोबत दिनांक २८/०८/२०२३ रोजी सोबत गेला होता. तो आज रोजी पर्यंत मिळून येत नसल्याने फिर्यादी त्याचेकडे त्यांचा मुलगा मिळून येत नसलेबाबत चौकशी करीत होते. परंतु शफी उर्फ शफीक अब्दुल मजिद शेख मु/३३ वर्षे हा उडवाउडवीची उत्तरे देत असल्याने त्यांनी पोलीस मदतीची मागणी केली. त्यावरून आर सी एफ पोलीस मदतीकरीता पोहचले असता, सदरबाबत पोलीसांनी शफी उर्फ शफीक अब्दुल मजिद शेख मु/३३ वर्षे याचेकडे पोलीसांनी कसून चौकशी केली असता त्याने दिनांक २८/०८/२०२३ रोजी त्याचे राहते घरामध्ये कोयत्याने जीवानीशी ठार मारून, त्याचे शरीराचे तुकडे करून किचनमध्ये ठेवले असल्याचे सांगितले.

सदर घटनेबाबत पोलीसांनी अधिक तपास केला असता, मयत हा फिर्यादी यांचा मानलेला मुलगा असून त्याचे आईवडील मयत झाल्याने तो ०८ वर्षाचा असल्यापासून फिर्यादी हे त्यांचा सांभाळ करीत आहे. आरोपी शफी उर्फ शफीक अब्दुल मजिद शेख हा फिर्यादी यांचा जावई असून आरोपी हा मयतावर त्याचे पत्नीची छेडछाड करीत असल्याचा संशय घेत होता व त्यावरून आरोपीचा मयतावर राग होता. म्हणून आरोपीने दिनांक २८/०८/२०२३ रोजी सकाळी मयत यांस घरी घेवून गेला व त्यास जीवे ठार मारले. व त्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मयताचे डोके, हात, व पाय धडापासून वेगळे करून वेगवेगळया पिशवीत भरून ठेवल्याचे आरोपीने सांगितले. सदर बाबत आर सी एफ पोलीस ठाणेस गु.र.क्र.४९९/२३ कलम ३०२, ३४२, २०१, भादवि सह कलम ३७ (१) (अ) सह १३५ मपोका अन्वये दाखल करून आरोपीस अटक केली असून पोनि रणजित जाधव, तपास करीत आहेत.

सदरचा गुन्हा मा.अप्पर पोलीस आयुक्त सो, पुर्व प्रादेशिक विभाग, श्री. विनायक देशमुख, मा.पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ - ६, श्री हेमराजसिंह राजपूत, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त सो, ट्रॉम्बे विभाग, मुंबई श्री. सुहास हेमाडे यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि श्री. मुरलीधर करपे, पोनि रणजित जाधव (गुन्हे), पोउपनि राहुल जाधव यांनी उघडकीस आणला.

-------------